# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट-२९९/२०२२ दिनांक : ०४/१०/२०२२

## ७३,४१,६००/- रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा वाहतुक करणाऱ्या २ आरोपीतांना मुद्देमालासह अटक - पेल्हार पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक ०३/१०/२२ रोजी पेल्हार पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. महेंद्र शेलार यांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा / तंबाखुजन्य सुगंधीत पान मसाला ने भरलेले दोन ट्रक मुंबई-अहमदाबाद हायवे मार्गाने गुजरातकडुन मुंबईकडे जाणार आहेत.

त्याअनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार दिनांक ०३/१०/२२ रोजी पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटिकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मुंबई-अहमदाबाद हायवे वरील मुंबई वाहीनीवर सापळा रचुन ट्रक चालक नामे १) अभिषेक सोमनाथ निबांळकर, २) बुवासाहेब तात्याबा कुमटकर, वय-३३ वर्षे, दोन्ही रा. ता.हवेली, जि.पुणे यांना दोन ट्रकसह ताब्यात घेतले व सदर ट्रकची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला ७३,४१,६००/- रुपये किंमतीचा तंबाखुजन्य सुगंधीत पान मसाला मिळुन आल्याने सदरबाबत पंचनामा करुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. I ८३६/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३२८ सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम कलम २६(२), ४, ३० (२) (ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर कार्यवाही दरम्यान ७३,४१,६००/- रुपये किंमतीचा तंबाखुजन्य सुगंधीत पान मसाला, २०,००,०००/- रुपये किंमतीचे २ ट्रक तसेच ३५,०००/- रुपये किंमतीचा इतर मुद्देमाल असा एकुण ९३,७६,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक , पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड तसेच पो.हवा. नामदेव ढोणे नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ३ यांनी पार पाडलेली आहे.

-----00000-----